ePaper
महापालिकांच्या निवडणुका लांबणीवर? 24 महापालिकांच्या होणार नव्याने प्रभाग रचना



| वर्ष - 6 । अंक - 220 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुणे शहर फेरीवाला समितीच्या निवडणूक रंगणार
- जावली तालुक्यात भात झोडणीच्या कामांना वेग
- पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी हालचालींना वेग?

www.mahaenews.com | ।बुधवार।दिनांक 23 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सिनेट निवडणुकीत 'कमळ फुलले'!

## विद्यापीठ विकास मंचचे सर्व उमेदवार विजयी : राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा पराभव

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा (सिनेट) नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपने पाठिंबा दिलेल्या विद्यापीठ विकास मंच पॅनलचे उमेदवार सागर वैद्य यांच्यासह उमेदवार निवडून आले आहेत.**

एकूण दहा जागांसाठी ३७ उमेदवार रिंगणात होते. विद्यापीठ विकास मंच या भाजपने पाठिंबा दिलेल्या तर महाविकास आघाडीच्या पॅनलमध्ये सामना रंगला होता. रविवारी मतदान झाले. एकूण २६.८५ टक्के मतदारांनी मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. मंगळवारी मतमोजणी होऊन निकाल घोषित करण्यात आला.



विद्यापीठ विकास मंचचे खुल्या गटातील उमेदवार सागर वैद्य यांनी दणदणीत विजय मिळवला. नाशिकच्या विजय सोनवणे यांनी एन टी गटातून तर बागेश्री मंठाळकर यांनी महिला राखीव जागेवर विजय मिळवला. गणपत नांगरे यांनी एस टी राखीव जागेवर विजय मिळवला. त्यांना आठ हजारपेक्षा अधिक मते मिळाली. एस सी राखीव जागेवर राहुल पाखरे निवडून आले आहेत. वैद्य यांच्याबरोबरच प्रसन्नजीत फडणवीस हेही खुल्या जागेवर निवडून आले आहेत.

**विजयी उमेदवार असे (कंसात मिळालेली मते)**

खुला गट – **सागर वैद्य (३७११), प्रसन्नजीत फडणवीस (४४४७)**

एनटी गट – **विजय सोनवणे (१४,१०१)**

महिला राखीव – **बागेश्री मंठाळकर (१५,६४९)**

एसटी गट – **गणपत नांगरे (१३,९९५)**

एस सी गट – **राहुल पाखरे**

ओबीसी गट – **सचिन गोर्डे (१३,४४२)**

अन्य विजयी उमेदवार असे – **संतोष ढोरे, युवराज नरवडे, दादाभाऊ शिनळकर**

## पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या मागण्यांना मिळणार न्याय

# उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पाळली "कमिटमेंट"

## उद्या मंत्रालयात मॅरेथॉन बैठक; आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड तसेच चाकण परिसरातील लघुउद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत दिलेली "कमिटमेंट" राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पाळली असून, उद्या मंत्रालयात मॅरेथॉन बैठक होणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आणि पिंपरी-चिंचवड लघुद्योग संघटनेच्या मागणीनुसार ही बैठक होणार असून, शहराच्या उद्योग विश्वाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा उद्योगविश्वात व्यक्त केली जात आहे.

काही दिवसांपूर्वी, विविध समस्या आणि मागणींबाबत पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या वतीने उद्योगमंत्री उदय सामंत यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन लवकरच या संदर्भात मंत्रालयात बैठक घेऊन संबंधित विभागाला सूचना दिल्या जातील, असे



आश्वासन उदय सामंत यांनी दिले होते. दरम्यान, उद्योगमंत्री सामंत यांनी उद्योजकांच्या मागण्या समजून घेण्यासाठी उद्योगजक मेळाव्यालाही उपस्थिती लावली. यासह भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या सहयोगाने उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करण्याबाबत सर्वोतोपरी पुढाकार घेतला जाईल, असे आश्वासनही उद्योगमंत्र्यांनी दिले होते. विशेष म्हणजे, शहरातील उद्योजकांच्या मागण्या समजून घेण्यासाठी शहराचा अवघ्या दीड महिन्यांत दोनदा दौरा आणि तात्काळ मंत्रालयात बैठक लावणारे उदय सामंत पहिले उद्योग मंत्री आहेत, अशा भावना लघु उद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी व्यक्त केल्या.

पिंपरी-चिंचवड महानगर पालिका तसेच चाकण औद्योगिक परिसरातील लघु उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांसदर्भात बुधवार दिनांक 23 नोव्हेंबर रोजी दुपारी 2 वाजता उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या मंत्रालयात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मॅरेथॉन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस लघुउद्योजक संघटनांसह लघु उद्योजक सदर बैठकीस उपस्थित राहणार आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी "कमिटमेंट" पाळल्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या उद्योग क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. उद्योगमंत्र्यांकडून संबंधित विभागाचे सचिव तसेच अधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सूचना देण्यात येणार आहेत.

# पुणे शहर फेरीवाला समितीची निवडणूक रंगणार!

## निवडणुकीसाठी 28 लाखाची रक्कम मंजूर



**पुणे । महाईन्यूज ।**

शहर फेरीवाला समितीतील आठ जागांसाठी निवडणूक होत असताना एकूण ३७ जणांचे अर्ज आले आहेत. यामध्ये सर्वाधिक चुरस ही सर्वसाधारण गटातील दोन जागांसाठी असून, त्यासाठी २२ जणांचे अर्ज आले आहेत. तर अनुसूचित जमाती (महिला) जागेची निवडणूक बिनविरोध झाली असून, भीमाबाई लाडके या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

शहर फेरीवाला समितीमध्ये २१ सदस्य असतात, त्यापैकी आठ सदस्य हे पथारी व्यावसायिक असतात. या ८ जागांच्या निवडणूकीसाठी ११५ इच्छुकांनी अर्ज नेले होते. त्यापैकी ५० जणांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. अर्जांच्या छाननीत ७ अर्ज अवैध ठरले. अर्ज छाननी आणि आक्षेपांवरील सुनावणीनंतर चाळीस उमेदवार शिल्लक राहीले आहे. अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागेसाठी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दोन अर्ज तांत्रिक कारणांनी बाद झाले. त्यामुळे लाडके यांचा एकच अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. सर्वसाधारण गटाच्या दोन जागांसाठी २२ उमेदवार रिंगणात आहे. सर्व साधारण गटाच्या महिलेसाठी आरक्षीत एका जागेसाठी पाच अर्ज आलेले आहेत. तर अनुसूचित जातीच्या एका जागेसाठी तीन, नागरिकांचा मागसवर्गीय प्रवर्गाच्या एका जागेसाठी दोन, अल्पसंख्याक प्रवर्गातील महिलांच्या एका जागेसाठी तीन आणि दिव्यांगांच्या एका जागेसाठी दोन उमेदवार आहेत. या प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या मतपत्रिका आहेत. निवडणुकीची तयारी सुरू असून ३०० कर्मचारी यासाठी नियुक्त केले आहेत. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमधील ३२ मतदान केंद्रांवर४ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर घोले रस्त्यावरील ऑर्ट गॅलरीत मतमोजणी होणार आहे. फेरीवाला समितीच्या निवडणुकीसाठी २८ लाख रुपयांच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली. निवडणूक प्रक्रिया, स्टेशनरी, कर्मचारी भत्ते, भोजन, वाहन व्यवस्था आदींसाठी हा निधी खर्च केला जाणार आहे, असे जगताप यांनी सांगितले. दरम्यान, या निवडणुकीसाठी ३९ लाखाचा निधी मागितला होता, पण स्थायी समितीने २८ लाख रुपये मंजूर केले.

# आळंदीत वैष्णवांचा मेळा

## ज्ञानेश्वर माऊलींचा 726 वा संजीवन समाधी सोहळा संपन्न

**पुणे । महाईन्यूज ।**



आळंदीत संत श्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींचा ७२६ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला. दुपारी सव्वा बाराच्या सुमारास हा सोहळा संपन्न झाला. सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. निर्बंधमुक्त सोहळा पार पडत असल्याने आळंदीत लाखो भाविक आल्याचं मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे. अंदाजे चार लाखांहून अधिक वारकरी आळंदीत आले असल्याचं सांगण्यात येत आहे. इंद्रायणी घाट वैष्णवांच्या मेळ्याने फुलून गेला आहे. ज्ञानोबा माऊलींच्या जयघोषात अवघी आळंदी दुमदुमून निघाली आहे. करोनाच्या दोन वर्षांच्या कार्यकाळानंतर पहिल्यांदाच माऊलींचा संजीवन समाधी सोहळा हा निर्बंधमुक्त पार पडला. गेल्या पाच दिवसांपासून वारकरी आळंदीत दाखल होत आहेत. ज्ञानोबा माऊली, तुकोबांच्या गजरात अनेक दिंड्या आळंदीत दाखल झाल्या. समाधी सोहळ्याची सुरुवात किर्तनाने झाली.

# फेरीवाला समिती निवडणुकीसाठी २८ लाखांची उधळण

**पुणे। महाईन्यूज ।**



महापालिका फेरीवाला समिती निवडणुकीसाठी २८ लाखांचा खर्च अपेक्षित असून हा निधी वर्गीकरणाद्वारे अंदाजपत्रकात योजना, प्रकल्पांसाठी राखीव असलेल्या निधीतून देण्यात यावा, असा प्रस्ताव प्रशासनाकडून स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे. स्थायी समितीच्या पुढील बैठकीत या प्रस्तावावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून निवडणुकीसाठी २२ हजार ८८९ विक्रेत्यांची मतदार यादी अंतिम करण्यात आली आहे. समिती निवडणुकीसाठी अर्थशीर्षक नसल्याने वर्गीकरण करून निवडणूक खर्च करता येणे शक्य आहे. निवडणुकीसाठी ३९ लाख ९४ हजार खर्च अपेक्षित आहे. मात्र आयुक्तांनी २८ लाखांचा खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार २८ लाखांचा निधी मिळावा, यासाठी हा प्रस्ताव अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून स्थायी समितीला देण्यात आला आहे.

# जाधववाडी येथे मोफत महाआरोग्य शिबीर

## निखिलदादा बोऱ्हाडे सोशल फाऊंडेशनच्यावतीने स्तुत्य उपक्रम

**पिंपरी । महाईन्यूज ।**





वातावरणातील बदल, दिवसेंदिवस वाढती थंडी परिणामी रोगराई पसरण्याची भिती निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली निखिलदादा बोऱ्हाडे सोशल फाऊंडेशनच्यावतीने भव्य मोफत आरोग्य शिबीर आणि मोफत शस्त्रक्रिया शिबाराचे आयोजन रविवार दिनांक 27 नोव्हेंबर 2022 रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत जाधववाडी येथील रामायण मैदानावर करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये विविध हॉस्पिटल व डायग्नोस्टिक सेंटर सहभागी होणार आहेत. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन निखील बोऱ्हाडे यांनी केले आहे. शिबिरासाठी आवश्यक कागदपत्रे आधारकार्ड, रेशनकार्ड, मेडिकल रिपोर्ट्स आहेत.

निखील बोऱ्हाडे म्हणाले की, नागरी आरोग्य जपणे...ही लोकप्रतिनिधी आणि सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना आपली जबाबदारी आहे. त्यासाठी परिसरातील नागरिकांकरिता एकाच छताखाली विविध आरोग्य तपासणी करता येईल, अशी सुविधा उपलब्ध करण्याचा आमचा संकल्प होता. त्यानुसार आम्ही या महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे.

**हृदयाच्या शस्त्रक्रिया, अन्ननलिका शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, हाडांचे फ्रॅक्चर शस्त्रक्रिया, कान, नाक व घसा शस्त्रक्रिया, अंगावरील मोठ्या चरबीच्या गाठीची शस्त्रक्रिया, अंगावरील मोठ्या चरबीच्या गाठीची शस्त्रक्रिया, हार्निया शस्त्रक्रिया, मणक्याच्या शस्त्रक्रिया, किडनीचे उपचार, गर्भपिशवी शस्त्रक्रिया, मुतखडा शस्त्रक्रिया, सांध्याच्या शस्त्रक्रिया, सांध्याच्या शस्त्रक्रिया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया, मॅमोग्राफी, दंत चिकित्सा व उपचार, डोळ्यांच्या तिरळेपणा, काचबिंदू शस्त्रक्रिया, बालरोग उपचार/शस्त्रक्रिया, अशी माहिती निखील बोऱ्हाडे यांनी दिली.**

# रिक्षा चालक-मालकांचा जीवन मरणाचा प्रश्न!

## 28 नोव्हेंबरच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा : बाबा कांबळे

**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**बेकायदेशीर टू व्हीलर बाईक व इतर विविध प्रश्नांमुळे, रिक्षा व्यवसाय संपुष्टात आला असून रिक्षा चालकांचे जगणं मुश्किल झाले आहे. यासाठी सर्वच रिक्षा संघटना आपापल्या परीने प्रयत्न करत असून सरकार दरबारी विविध मागणीसाठी आंदोलन केले आहे. परंतु सरकारने आश्वासनाच्या पलीकडे कोणतेही प्रश्न सोडवले नाही. यामुळे आता पुणे शहरातील सर्व संघटना एक झाल्या असून रिक्षा चालक मालकाने देखील एकीचं बळ दाखवून लाखोच्या संख्येने एकत्र येऊन २८ नोव्हेंबर २०२२ रोजी होणारे आंदोलन यशस्वी करावे. आता नाही तर कधीच नाही हा आपल्या जीवन मरणाची लढाई आहे. या लढाईमध्ये आपल्याला यश मिळवायचे आहे. एकत्र आल्याशिवाय सरकार आपल्याकडे लक्ष देणार नाही आपले प्रश्न सुटणार नाहीत, असे महाराष्ट्र रिक्षा संस्थापक अध्यक्ष बाबा कांबळे म्हणाले.**



महाराष्ट्र रिक्षा पंचायत वतीने पिंपरी कार्यालय व पुणे येथील मंगळवार पेठ येथील कार्यालयात रिक्षा स्टॅन्ड प्रमुख व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली यावेळी बाबा कांबळे बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र रिक्षा पंचायत पुणे शहर कोर कमिटीचे विलास केमसे पाटील ,मोहम्मद भाई शेख,माझी अध्यक्ष शफिक भाई पटेल, रिक्षा ब्रिगेड प्रमुख बाळासाहेब ढवळे, पुणे जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण शेलार, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख संजय दौंडकर, रवींद्र लंके, तोफिक कुरेशी, किरण एरंडे, संजय शिंदे, अन्सार शेख, उपस्थित होते.

बाबा कांबळे म्हणाले रिक्षा संघटनेने आपल्यातले मतभेद बाजूला ठेवून, रिक्षा चालकांच्या हितासाठी एकत्र येणे आवश्यक आहे ज्या संघटना अजूनही आंदोलनामध्ये सहभागी झाल्या नाहीत त्यांनी आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे माझे त्यांना हात जोडून नम्र विनंती आहे. रिक्षा चालकांचे प्रश्न अत्यंत बिकट व गंभीर होत आहे त्यांच्या प्रश्नांवरती एकत्र येऊन लढण्याची वेळ आहे. अन्यथा शेतकऱ्यांप्रमाणे रिक्षा चालकांना देखील आत्महत्या करावे लागेल.

यापूर्वी देखील आठ रिक्षा आत्महत्या केल्या आहेत. कोविडनंतर अनेक रिक्षालकांच्या रिक्षा ओढून नेल्या. त्यांचे संसार उघड्यावरती आले. आता ते हळूहळू आपला व्यवसाय करत आहेत परंतु, एका भाकरीमध्ये शंभर तुकडे सरकार करत आहे.

### मोठ्या भांडवलदार विरोधातील लढा...

हा लढा मोठे भांडवलदार यांच्या विरोधामध्ये आहे. रिक्षा व सेवा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भांडवलदार येत असून केंद्र व राज्य सरकार भांडवलदारांच्या फायद्याचे निर्णय घेत आहे. त्यांच्या सोयीचे कायदे करत आहे, यातून पूर्वपार चालत आलेल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था रिक्षासारखी व्यवस्था मेटाकुटीला आली असून त्यावर अवलंबून लाखो रिक्षा चालक मालकांचे संसार उध्वस्त होत आहेत. ही लढाई खूप अवघड आहे. परंतु सर्वजण एकत्र आल्यास ती अधिक सोपी होईल, रिक्षा संघटनेचे नेते सर्व मंडळी प्राणपणाने लढा देत आहेत. रिक्षा चालकांसाठी लढणाऱ्या संघटनांच्या पाठीशी रिक्षा चालक मालकांनी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन देखील यावेळी बाबा कांबळे यांनी केले.

---

# महाराष्ट्राच्या अवमानाचा कुटील डाव हाणून पाडणार !

## अजित गव्हाणे : राज्यपालांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी आक्रमक

**पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्राला चुकीच्या दिशेने नेलं जातात आहे. हा कुटील डाव थांबवावा लागेल. मतं मागताना छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांची नावे घेतात. पण नंतर याच महापुरुषांचा सर्रास अपमान करून राज्यातील वातावरण बिघडविण्याचे काम भाजपा करत आहे. मात्र, महाराष्ट्राचा सातत्याने अपमान करणाऱ्यांचा कुटील डाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाणून पाडणार आहे. यापुढे महाराष्ट्राच्या महापुरुषांचा अपमान सहन करणार नाही, असा सज्जड इशारा पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिला.**




राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मंगळवारी आंबेडकर चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्ष आणि राज्यपाल कोश्यारी यांचा अजित गव्हाणे यांनी खरपूस समाचार घेतला. आंदोलनात कोश्यारी यांच्या निषेधाची फलके लावून त्यांनी महाराष्ट्राची माफी मागण्याची मागणी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख, माजी महापौर मंगला कदम, भाऊसाहेब भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती.

> छत्रपती राज्यपाल कोश्यारी यांनी काही महिन्यांपूर्वीही सावित्रीबाई फुले, महात्मा फुले आणि छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल असेच अपमानास्पद वक्तव्य केले होते. तेव्हादेखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तीव्र आंदोलन छेडले होते. यापुढेही महापुरुषांचा अपमान आम्ही सहन करणार नाही. पूर्वीपेक्षाही जास्त आक्रमक होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तीव्र आंदोलन करणार आहे.
>
> **-अजित गव्हाणे, शहराध्यक्ष.**

पुढे बोलताना अजित गव्हाणे म्हणाले की , महाराष्ट्र हा फुले, शाहू, आंबेडकरांचा आहे. आपल्या महाराष्ट्राचा आदर्श केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये घेतला जातो.

लोकांचं राज्य पहिल्यांदा खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलं. अशा आदर्श छत्रपती शिवरायांचा अपमान करणं, चुकीची वक्तव्य करणं हे वारंवार आणि जाणून बुजून भारतीय जनता पक्षाकडून केलं जात आहे. या प्रकाराकडे शहरातील भारतीय जनता पक्षाच्या आमदार, खासदारांनी दुर्लक्ष करण्याऐवजी आपली भुमिका स्पष्ट करावी. कारण मतं मागताना ही मंडळी याच महापुरुषांचे नाव घेतात. सत्तेवर येतात आणि त्यानंतर याच महापुरुषांचा अपमान पाहूनही मूग गिळून गप्प बसतात. त्यामुळे या लोकांना याबद्दल जाब विचारायलाच हवा.

## संपादकीय »

### भरपाईची भाषा

***संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान बदलविषयक परिषदेतील चर्चेची 'नुसत्या हवेतल्या गप्पा' अशी हेटाळणी होणे टळले, ते केवळ एका मुद्द्यामुळे. तो मुद्दा आहे नुकसान भरपाईचा.***

श्रीमंत देशांनी निदान तत्त्वतः तरी गरीब देशांना भरपाई देण्याचे मान्य केले, ही परिषदेची कमाई म्हणावी लागेल. त्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी आधी लक्षात घ्यावी लागेल ती एकूणच जागतिक व्यवस्थेतील सध्याची विषमता. जगापुढे हवामान बदलाला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळणे हे आव्हान आहे. कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन रोखणे हे त्यातील सर्वांत प्रमुख. जीवाश्म इंधनांचा वापर करून निर्माण केलेली ऊर्जा वापरून अमेरिका, युरोपातील देशांनी समृद्धीचे सोपान पार केले. दरडोई उत्पन्न वाढवले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक व्यापारातही वर्चस्व मिळवले. त्याची फळे त्यांना मिळाली; पण या प्रक्रियेत पर्यावरणाची जी काही हानी झाली, त्याच्या झळा मात्र सगळ्याच मानवजातीला बसल्या आणि बसत आहेत. जे देश आता कुठे डोके वर काढू पाहात आहेत, आपल्या लोकसंख्येला थोडे बरे जीवनमान मिळवू देऊ पाहात आहेत, त्यांना जेव्हा जागतिक परिषदेत श्रीमंत देश कार्बन उत्सर्जन रोखण्याचे ब्रह्मज्ञान सांगू लागतात, तेव्हा प्रतिक्रिया येणे साहजिकच म्हटले पाहिजे. दरडोई कर्ब उत्सर्जनाचे आकडे पाहिले तर ही तफावत स्पष्ट होते. युरोपीय देशांचे दरडोई कर्ब उत्सर्जन १०.५ टन, अमेरिकेचे २३ टन तर भारताचे फक्त दोन टन. खच्चून भरलेल्या रेल्वेगाडीत जागा मिळविण्यासाठी धडपडणारा बाहेर राहिलेल्यांविषयी तोपर्यंत सहानुभूती बाळगतो, जोपर्यंत त्याला आत प्रवेश मिळत नाही. पण एकदा का प्रवेश मिळाला, की नव्याने आता कुणी येऊ नये, असे त्याला वाटू लागते. पाश्चात्त्य जगतातील अनेक देशांचा अशा प्रकारचा दृष्टिकोन असल्याने पर्यावरणाच्या बाबतीतील जागतिक उद्दिष्टे साध्य करण्यात मतभेदांचा अडथळा येऊ लागला. याविषयीच्या मंथनातून गरीब देशांना भरपाई मिळाली पाहिजे, अशी मागणी तीन दशकांपूर्वी पहिल्यांदा मांडली गेली. आजवर तरी या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या होत्या. अलीकडच्या काळात पूर, दुष्काळ, चक्रीवादळे यासारखे हवामान बदलाचे जे दुष्परिणाम तीव्रतेने समोर येत आहेत, ते पाहता या मागणीने उचल खाल्ली. इजिप्तमधील ताज्या परिषदेत श्रीमंत राष्ट्रांनी त्यामागची भूमिका निदान तत्त्वतः मान्य केली, ही गोष्टदेखील थोर झाली म्हणायची! आता मुद्दा आहे तो तपशीलाचा. भरपाईसाठी निधी उभा करण्याविषयी अद्याप काही रचना ठरलेली नाही. ती ठरवणे, त्याप्रमाणे निधी उभा करणे आणि योग्य ती भरपाई गरीब राष्ट्रांना मिळणे ही पुढची उद्दिष्टे आहेत आणि त्यात कसोटी लागेल.

# गोवरापासून धडा घेणार का?




गोवरामुळे आतापर्यंत नऊ निष्पाप बाळांचे प्राण गेले आहेत. गोवरामुळे मृत्यू होऊ शकतो, ही शक्यता मागील काही दशकांमध्ये वेगाने झालेल्या लसीकरणामुळे संपली होती. मात्र, हाच संसर्ग आता या बाळांच्या जिवांवर बेतला आहे. कोणत्याही व्यवस्थेमध्ये मुलांचा मृत्यू ही अत्यंत गंभीर बाब असते. त्यात आकड्यांची लपवाछपवी करण्यापेक्षा रुग्णसंख्या, मृत्यूचे आकडे व संसर्गाची स्थिती यासंदर्भात यंत्रणांनी अत्यंत पारदर्शक माहिती दिली, तर सामान्यांचा या यंत्रणेवर असलेला विश्वास अधिक वाढतो. करोनासारख्या संसर्गाच्या साथीमध्ये याच शहरात हजारो माणसे मेली, तितकीच मृत्यूवर मात करून परत आली. पालिकेने या साऱ्याचा लेखाजोखा स्पष्टपणे मांडला होता. त्यात लपाछपी नव्हती. आरोपप्रत्यारोप, व्हिडीओचे व्हायरल राजकारण अशा अनेक पातळ्यांवर तेव्हाही यंत्रणेला तोंड द्यावे लागले. पण, त्यांनी कच खाल्ली नाही. गोवर संसर्गाच्या या संकटांशी दोन हात करण्यासाठी तीच हिंमत, तेच नियोजन व पारदर्शकता असण्याची गरज आहे.

मुंबईतील सर्वांत मोठी झोपडपट्टी म्हणून धारावीकडे पाहिले जाते. करोना संसर्गाच्या काळामध्येही इथे संसर्गाचा फैलाव होऊ नये म्हणून यंत्रणा देव पाण्यात घालून बसली होती. तरीही हा उद्रेक झालाच. तो जितका धारावीत होता तितकाच तो एम वॉर्डमध्येही होता. मागील काही वर्षांत एम वॉर्डला 'मिनी धारावी'चे स्वरूप येते आहे. देवनार डम्पिंगची संपलेली क्षमता, त्यावरील कचऱ्याच्या अर्थकारणावर अवलंबून असलेली कुटुंबे, येथील गुन्हेगारी, हातावर पोट असलेला मोठ्या प्रमाणात या वस्त्यांमध्ये राहायला आलेला स्थलांतरित कामगार, दाटीवाटीची घरे आणि त्यात कोंबलेली कुटुंबे. कुटुंबनियोजनाचा अभाव, हाताशी एक मूल असताना गर्भात दुसरे वाढवणारी आई... असा जगण्याचा विचित्र तिढा आहे.



आता गोवराचा संसर्ग वाढल्यानंतर या मुद्द्यांवर चर्चा सुरू झाली. या समूहाचे जगणे आतापर्यंत कुणाच्या खिजगणतीत नव्हते. अस्तित्त्वासाठी असलेली लढाई, ड्रग्जचे अड्डे, कचऱ्यावरून होणाऱ्या हाणामाऱ्या, त्यातले अंतर्गत राजकारण, अवैध व्यवसाय या साऱ्याचा इथल्या माणसांच्या जगण्यावर आणि यंत्रणेवरही दाब आहे. मुंबई शहराच्या केंद्रबिंदूवर राहणारी ही माणसे आसपासच्या सगळ्या त्रिज्यांपासून तुटलेली आहेत. लसीकरणासाठी येथील लोक तयार होत नाही, असा युक्तिवाद आरोग्ययंत्रणेकडून केला जातो. त्याला प्रत्युत्तर देताना ही माणसे आरोग्याच्या पुरेशा सुविधा मिळत नाहीत असे सांगतात. रस्त्याच्या कडेला असलेल्या वस्त्यांमध्ये आरोग्यसर्वेक्षण पूर्ण होतात. आतल्या कोंदट वातावरणातील मुले तशीच सुटून जातात. लसमात्रा घेण्यापूर्वी मुलांना गोवर का झाला हे शोधण्याचे आव्हान आता पालिकेपुढे आहे.

कुपोषण, अंधश्रद्धा, खालावलेली रोगप्रतिकारशक्ती, कुटुंबनियोजनाचा अभाव अशी अनेक कारणे गोवरमृत्यूसाठी पुढे येत आहेत. करोनासंसर्गाच्या काळात नियमित लसीकरणाचा कार्यक्रम पूर्ण ढेपाळला. पण याच काळात कुटुंबनियोजनाच्या सुविधा एम वॉर्डसारख्या प्रभागामध्ये उपलब्ध नव्हत्या. पस्तीशी-चाळीशी पार केलेल्या, दोन-तीन मुलांच्या मातृत्वाची जबाबदारी असलेल्या अनेक स्त्रियांना पुन्हा गर्भारपणाचा भार पेलावा लागला. शून्य ते ११ महिने या वयोगटातील २७ बालकांना गोवराचा संसर्ग झाला आहे. तर एक ते चार वयोगटामध्ये ६४ बालकांना गोवराची लागण झाली आहे. या बाळांच्या जन्माचा कालावधी हा या संसर्गाच्या काळातला आहे. एम वॉर्डसारखी स्थिती असलेल्या मुंबईतल्या कोणत्याही परिसरातील सामान्यांना एकूण वैद्यकीय उपचाराची सुविधा सहजपणे का मिळत नाही, याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. गोवराने उपस्थित केलेले हे प्रश्न केवळ वैद्यकीय नाहीत, तर त्यात एकमेकांमध्ये गुंतलेले अनेक पेच आहेत.

## औषधावरच औषध शोधण्याची वेळ...

**'डॉक्टर, मला एका दिवसात बरं करा, स्ट्राँग औषध द्या,' असा आग्रह आपल्यापैकी अनेक जण अनेकदा करतात. पण ही स्ट्राँग औषधेच भविष्यात गंभीर गुंतागुंत निर्माण करणार नाहीत ना?**

कोविडसारखी काही वैश्विक संकटे झंझावातासारखी येतात, जग दणाणून सोडतात, पण काही जागतिक समस्या मात्र हळूहळू वाटचाल करत असतात. २०५० ला अमुक होणार, २०३० ला तमुक होईल असे वाचनात आले तरी आपण तितकेसे गांभीर्याने घेत नाही. आज फार काही बिघडत नाही, पुढचे पुढे पाहू, असे वाटून खडबडून जागे होत नाही. अशा समस्यांची माहिती असते, पण महती माहीत नसते. अशाच दोन समस्या, म्हणजे जागतिक हवामान बदल आणि अँटिबायोटिक प्रतिरोध. या दोन्ही विषयांवर नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक चर्चा होत आहे आणि होणार आहे. संयुक्त राष्ट्रांतर्फे ६ ते १८ नोव्हेंबरदरम्यान इजिप्त येथे आयोजित करण्यात आलेल्या हवामान बदलविषयक शिखर परिषदेत (कॉप २७) या समस्येचा आढावा घेण्यात आला. १८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान जागतिक अँटिबायोटिक (प्रतिजैविक) जनजागरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. प्रतिजैविक प्रतिरोध ही एक




छुपी मात्र गंभीर साथ आहे आणि ती नकळत आपल्या दाराशी येऊन उभी ठाकली आहे. सूक्ष्म जंतू प्रबळ होत आहेत आणि प्रतिजैविके निष्प्रभ ठरत आहेत. जंतुप्रादुर्भाव नियंत्रण कठीण होत आहे आणि बरीच प्रतिजैविके त्यांच्या अस्तित्वाची लढाई हरत आहेत. जगात २०१९ मध्ये १३ लाख रुग्ण हे थेट बंडखोर जंतुप्रादुर्भावाने मृत्युमुखी पडले. हे प्रमाण मलेरिया (६.५ लाख मृत्यू) किंवा एड्स (८.५ लाख मृत्यू) पेक्षा जास्त आहे.

प्रतिजैविक प्रतिरोध हा मानवजातीसाठीचा एक जागतिक धोका आहे. यासंदर्भातील प्रबोधनासाठी जागतिक आरोग्य संघटनेने २०१५ पासून दर नोव्हेंबरमध्ये जागतिक प्रतिजैविक जनजागरण सप्ताह आयोजित करण्यास सुरुवात केली. हे किती विचित्र आहे पाहा- औषधांचा शोध, विकास, उपयोग मानवाला वाचण्यासाठी, पण आज आटापिटा करावा लागतोय ते एका प्रकारच्या औषधाला वाचविण्यासाठी. हे वैद्यकीय इतिहासात अभूतपूर्व आहे. हा खटाटोप नेमका का करावा लागत आहे? तर मानवी चुकांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे.

मानवावरील उपचारांत आणि अन्नोत्पादक प्राण्यांमध्ये वजनवाढीसाठी व जंतुप्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिजैविकांचा अतिरेकी वापर होत आहे. विविध कारणांमुळे पर्यावरणात जागोजागी प्रतिजैविकांचे अंश साठत गेले आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणजे आज समोर ठाकलेली प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या. मानव, प्राणी, वनसंपत्ती, अन्न, जमीन, पाणी हे सारे काही परस्परांशी जोडलेले आहे. त्यामुळे प्रतिजैविकांचा गैरवापर कुठेही झाला तरी संपूर्ण परिसंस्थेवर त्याचा दुष्परिणाम होतो.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जावली तालुक्यात भात झोडणीच्या कामांना वेग



जावली । भात काढल्यानतर झोडपणी केली जाते. जावली खोऱ्यातील तांदळाचे कोठार असलेल्या आलेवाडीमध्ये भात झोडणीच्या कामांना वेग आला आहे. यावेळी रुपेश दुटाळ, लोकेश दुटाळ, इंदुबाई दुटाळ, स्वाती दुटाळ, छाया दुटाळ, गंगुबाई बांदल, कमल बांदल, जनाबाई दुटाळ आदी शेतकरी मंडळी आपल्या शेतात भात झोडपणीच्या कामांत व्यस्त आहेत. (छाया : निलेश दुटाळ)

## संत्र्याचे भाव गडगडले

### बांगलादेशच्या आयात शुल्कवाढीचा निर्यातीवर परिणाम

।अमरावती। महाईन्यूज ।




विदर्भातील एकूण संत्री उत्पादनाच्या ३५ टक्के माल आयात करणाऱ्या बांगलादेशने आयात शुल्कात वाढ केल्याने निर्यातीला फटका बसला आहे. परिणामी, यंदा संत्र्याचे भाव गडगडले आहेत. अतिवृष्टीतून वाचलेल्या संत्री बागा फळांनी लगडल्या असल्या तरी निर्यात घटल्याने विदर्भातील संत्री उत्पादक आणि निर्यातदार हवालदिल झाले आहेत. बांगलादेशने संत्र्यावरील आयात शुल्क कमी करावे, यासाठी केंद्र सरकारने बांगलादेश सरकारशी चर्चा करावी, अशी मागणी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, अशी माहिती मोर्शीचे आमदार देवेंद्र भुयार यांनी दिली.

बांगलादेशच्या आयात शुल्कवाढीचा फटका शेतकऱ्यांनाही बसणार आहे. निर्यात घटल्याने उत्पादकांना देशातच संत्री विकावी लागतील किंवा त्यांवर प्रक्रिया करावी लागेल. त्यामुळे दर आणखी पडतील, अशी भीती आहे. विदर्भातील वरुड, मोर्शी, परतवाडा, अचलपूर, चांदूरबाजार, काटोल, नरखेड, सावनेर, कळमेश्वर या भागांत मोठ्या प्रमाणात संत्र्याच्या बागा आहेत. विदर्भातील एकूण संत्री उत्पादनाच्या सुमारे ३५ टक्के संत्र्याची निर्यात बांगलादेशमध्ये केली जाते. गेल्या वर्षी विदर्भातून दररोज सुमारे २०० ट्रक संत्री बांगलादेशला निर्यात करण्यात येत होती. एका ट्रकमध्ये साधारणत: २५ ते २७ टन संत्री मावतात. गेल्या वर्षी दोन महिन्यांत सुमारे चार लाख टन संत्री बांगलादेशला निर्यात करण्यात आली होती. मात्र, या वर्षी बांगलादेशने संत्र्यावरील आयात शुल्कात पुन्हा वाढ केली आहे. गेल्या वर्षी प्रतिकिलो ५१ रुपये आयात शुल्क होते. यंदा वाढवून ते ६३ रुपये केले आहे.

## दापोलीतील साई रिसॉर्टवर आज हातोडा पडणार!

### किरीट सोमय्याही दापोलीत दाखल!

। मुंबई । महाईन्यूज ।




गेल्या काही महिन्यांपासून किरीट सोमय्या विरुद्ध अनिल परब या वादाच्या केंद्रस्थानी राहिलेलं दापोलीतलं साई रिसॉर्ट आज पाडलं जाणार आहे. अनिल परब यांच्या मालकीचं हे रिसॉर्ट अनधिकृत असल्याचा आरोप किरीट सोमय्यांनी सर्वात आधी केला होता. पर्यावरण विभागानं आखून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करून समुद्रकिनारी हे रिसॉर्ट बांधण्यात आल्याचा आरोप किरीट सोमय्यांनी केला होता. यावर न्यायालयात रीतसर सुनावणी झाल्यानंतर अखेर आज दापोलीतील साई रिसॉर्टवर हातोडा पडणार आहे.

दोन आठवड्यांपूर्वीच दापोलीतील साई रिसॉर्ट बांधकामप्रकरणी अनिल परब यांच्याविरोधात भादंवि कलम ४२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती किरीट सोमय्यांनी ट्विटरवर दिली होती. त्यांच्यासोबतच रत्नागिरीतील अजून काही व्यक्तींवर हा गुन्हा दाखल झाल्याचं सोमय्यांनी सांगितलं होतं.

दापोली रिसॉर्टच्या जमीन खरेदी व्यवहारामध्ये आणि बांधकामातही अनियमितता झाल्याचा आरोप सोमय्यांनी केला होता. अनिल परब यांनी चार वर्षांपूर्वी जुलै २०१८मध्ये झालेल्या विधान परिषद निवडणुकांसाठी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये या रिसॉर्टचा उल्लेख केला होता. त्यासाठी वीजजोडणी अर्जही त्यांनी केला होता. तसेच, या रिसॉर्टसाठी घरपट्टीही भरण्यात आली होती, असा दावा किरीट सोमय्यांनी केला आहे. या सर्व प्रकरणी अनिल परब यांची ईडीकडून चौकशी सुरू आहे. रिसॉर्टशी आपला काहीही संबंध नसल्याचा दावा अनिल परब यांनी केला आहे.

# पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी हालचालींना वेग?

## लष्करातील बड्या अधिकाऱ्याचं मोठं विधान



**। नवी दिल्ली ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काही दिवसांपूर्वी पाकव्याप्त काश्मीरबाबत सूचक विधान केलं होतं. पाकव्याप्त काश्मीरचा लवकरच भारतात समावेश केला जाईल, असं विधान राजनाथ सिंह यांनी केलं होतं. हे विधान ताजं असताना आता भारतीय लष्करातील बड्या अधिकाऱ्यानं मोठं विधान केलं आहे. भारत सरकारने आदेश दिल्यास पाकव्याप्त काश्मीर भारताला जोडण्यासाठी भारतीय सैन्य तयार आहे, असं विधान लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केलं आहे.**

लेफ्टनंट जनरल पदावरील अधिकाऱ्याने अशाप्रकारचं वक्तव्य केल्याने चर्चांना उधाण आलं आहे. पाकव्याप्त काश्मीर पुन्हा भारताला जोडण्यासाठी हालचालींना वेग आल्याचे संकेत मिळत आहेत. लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी पत्रकार परिषदेत म्हणाले, “जसं आपल्याला माहीत आहे की, पाकव्याप्त काश्मीर भारताला जोडण्याबाबतचा प्रस्ताव संसदेत पाठवला आहे. त्यामुळे यामध्ये काहीही नवीन नाही. हा संसदेतील प्रस्तावाचा एक भाग आहे. आता उरला प्रश्न भारतीय सैन्यांचा... तर भारत सरकारने दिलेला कोणताही आदेश अमलात आणण्यासाठी भारतीय सैन्य तयार आहे. जेव्हा याबाबतचा आदेश दिला जाईल, तेव्हा आम्ही पूर्ण तयारीने पुढे जाऊ...” असं विधान उपेंद्र द्विवेदी यांनी केलं आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ७१ हजार उमेदवारांना दिली नोकरीची नियुक्तीपत्रे!

**। नवी दिल्ली।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



एकीकडे विरोधकांकडून देशातील बेरोजगारीच्या समस्येवरून केंद्र सरकारला लक्ष्य केलं जात असताना दुसरीकडे मोदी सरकारनं रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नियुक्तीपत्रे देण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ‘रोजगार मेळावा’ योजनेचा भाग म्हणून तब्बल ७१ हजार तरुणांना नियुक्तीपत्र दिली आहेत. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून मोदींनी नियुक्तीपत्रे देण्यात आलेल्या तरुणांशी संवादही साधला. शिक्षक, प्राध्यापक, नर्स, नर्सिंग ऑफिसर, डॉक्टर, फार्मासिस्ट्स, रेडिओग्राफर्स अशा अनेक तांत्रिक आणि पॅरामेडिकल पदासाठी ही नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत.

बेरोजगारीच्या समस्येवर तोडगा म्हणून केंद्र सरकारने ‘रोजगार मेळावा’ या नावाने हा उपक्रम सुरू केला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ऑक्टोबर महिन्यात केंद्र सरकारकडून ७५ हजार तरुणांना नियुक्तीपत्रे देण्यात आली होती. या सर्व नियुक्त्यांमध्ये सर्वाधिक नियुक्त्या या केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये अर्थात सीएपीएफमध्ये करण्यात आल्या आहेत. केंद्रीय गृहविभागाकडून या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून रोजगारासाठी प्राधान्य दिलं जात असून त्यांनी दिलेलं आश्वासन पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात असल्याचं केंद्र सरकारकडून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे साधलेल्या संवादातून मोदींनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. “रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून हे स्पष्ट होतंय की केंद्र सरकारनं तरुणांना सरकारी नोकरी देण्याची मोहीम राबवायला सुरुवात केली आहे.

# केंद्र सरकारने पदोन्नती रोखली, कनिष्ठ अधिकाऱ्यांना बढती

## सैन्यातील 34 महिला अधिकाऱ्यांची सर्वोच्च न्यायालयात याचिका

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।**



भारतीय सैन्यातील ३४ महिलांनी केंद्र सरकारने त्यांची पदोन्नती स्थगित करून कनिष्ठ अधिकाऱ्यांना बढती दिल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या सर्व महिला अधिकारी १९९२ ते २००७ दरम्यान सैन्यात भरती झाल्या होत्या. केंद्र सरकारने आमची पदोन्नती स्थगित करून कनिष्ठ अधिकाऱ्यांना बढती दिली. केंद्र सरकारचा हा निर्णय, महिलांना कायस्वरुपी आयोग देण्याबाबतच्या सर्वोच्च न्यायलयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे, असे या याचिकेत सांगण्यात आले होते. दरम्यान, या याचिकेवर सोमवारी सुनावणी पार पडली असून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. भारतीय सैन्यात सेवा देणाऱ्या सर्व पात्र महिला अधिकाऱ्यांना कायस्वरुपी आयोग देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले होते. तसेच २०१० सालच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालाची अवमान केल्याबद्दल केंद्र सरकारला फटकारले होते. याचबरोबर मार्च २०२१ मध्ये झालेल्या एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान, सैन्यात सेवा देताना मिळणारे सर्व लाभ महिला अधिकाऱ्यांनाही दिले जावे. याबाबत तीन महिन्यात निर्णय घ्यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. सर्वोच्च न्यायालच्या मार्च २०२१ च्या निर्णयाला १८ महिने उलटून गेल्यानंतरही संरक्षण मंत्रालयाकडून आमच्या पदोन्नदीबाबत कोणतीही समिती गठीत करण्यात आली नाही, असा तर्क महिला अधिकाऱ्यांकडून नव्याने दाखल केलेल्या याचिकेत देण्यात आला आहे.

# गुजरातमध्ये पुन्हा भाजपा ?

## चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा दावा

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

येत्या १ डिसेंबर रोजी गुजरात विधानसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्याचे मतदान पार पडणार आहे. याच कारणामुळे येथे प्रचार शिगेला पोहोचला आहे. काँग्रेस, आप पक्षांसह भाजपानेदेखील आपली कंबर कसली आहे. मागील २७ वर्षांपासून येथे भाजपाची सत्ता आहे. असे असताना महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा दावा केला आहे. सध्या गुजरातमध्ये विरोधी पक्षच अस्तित्वात नाही. या निवडणुकीत भाजपा १४५ पेक्षा जास्त जागांवर विजयी होणार आहे. यावेळीदेखील गुजरातमध्ये भाजपाचीच सत्ता येणार आहे, असे बावनकुळे म्हणाले आहेत. ते आज (२२ नोव्हेंबर) माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. “जेव्हा-जेव्हा एखाद्या प्रदेशात निवडणूक लागते, तेव्हा आम्ही तेथे प्रचारासाठी जात असतो. पक्षाचा प्रचार करण्यासाठी कोणीही कोणाला बोलवत नाही. भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता उठतो आणि प्रचाराला जातो. कोणालाही बोलवण्याची गरज भासत नाही. ती आमची सवय आहे. मागील २७ वर्षांत गुजरातमध्ये भाजपाचे सरकार आहे. यावेळीदेखील आम्ही १४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार आहोत. तसे वातावरण गुजरातमध्ये आहे. गुजरातमध्ये विरोधी पक्ष नाहीये. येथे आम्ही १४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार आहोत,” असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. राज्यपाल भगसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले आहे. यावरही बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. “पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच इतर सर्व नेते छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानूनच काम करतात. मोदी यांनी जेवढे निर्णय घेतले, त्या सर्व निर्णयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचा दाखला आहे.




**“जेव्हा-जेव्हा एखाद्या प्रदेशात निवडणूक लागते, तेव्हा आम्ही तेथे प्रचारासाठी जात असतो. पक्षाचा प्रचार करण्यासाठी कोणीही कोणाला बोलवत नाही. भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता उठतो आणि प्रचाराला जातो. कोणालाही बोलवण्याची गरज भासत नाही. ती आमची सवय आहे. मागील २७ वर्षांत गुजरातमध्ये भाजपाचे सरकार आहे. यावेळीदेखील आम्ही १४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार आहोत. तसे वातावरण गुजरातमध्ये आहे. गुजरातमध्ये विरोधी पक्ष नाहीये. येथे आम्ही १४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार आहोत,” असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.**

# छोट्या पडद्यावर पुन्हा एकदा पाहता येणार सासू सुनेची जुगलबंदी

झी मराठी वाहिनीवरील मालिका कायमच चर्चेत असतात. प्रेक्षकांचादेखील या मालिकांना उत्तम प्रतिसाद मिळत असतो. झी वाहिनी आता एक नवी मालिका सुरु होणार आहे. सासू सुनेच्या नात्यावर भाष्य करणारी नवी मालिका अगं अगं सूनबाई काय म्हणता सासूबाई" लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. एका खोडकर सुनेच्या आणि तिच्या खोडीवर कुरघोडी करणाऱ्या खट्याळ मिश्किल सासूची गोष्ट यात दाखवली जाणार आहे.

नुकताच या मालिकेचा प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.आधुनिक काळात,




सासू सूने मधील नातं, एकमेकींशी कधी भांडत तर कधी एकमेकींना चिमटे काढत कसं बहरत जातं, याचा धमाल प्रवास यात बघायला मिळेल या मालिकेत पहिल्यांदाच जेष्ठ अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी सासूच्या भूमिकेत तर खोडकर सून साकारतेय स्वानंदी टिकेकर. निर्मात्यांनी अद्याप मालिकेच्या संपूर्ण स्टार कास्टची नावे उघड केलेली नाहीत परंतु सूत्रांनुसार, लवकरच दोन प्रसिद्ध कलाकार देखील या मालिकेचा भाग असतील. निर्माते त्यांचा एक नवीन प्रोमोदेखील

# भोला' चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये अजय देवगण सलमान खान झळकणार?

बॉलिवूडचा सिंघम अजय देवगणचा 'दृश्यम २' हा चित्रपट सध्या चित्रपटगृहात धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाची यशस्वी घोडदौड सुरू असतानाच अजयने त्याच्या आणखीन एका आगामी चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांसमोर आणली आहे. अजयच्या 'भोला' या चित्रपटाचा टीझर आज प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाच्या टीझरने सगळ्यांचंच लक्ष वेधलं आहे.



'भोला' चित्रपटाच्या टीझरनंतर आता एक मोठी बातमी समोर आली आहे. या चित्रपटाच्या नंतर अजय देवगण याचा पुढील भाग आणणार आहे. महत्त्वाचं म्हणजे या भागात भाईजान अर्थात सलमान खान दिसणार आहे. अजय देवगण सलमान खान चांगले मित्र आहेत. याआधी ते 'सन ऑफ सरदार' चित्रपटात दोघे एकत्र दिसले होते. अजय त्या चित्रपटात मुख्य भूमिकेत होता तर सलमान खान पाहुणा कलाकार म्हणून दिसला होता.

# रश्मिका मंदाना व विजय देवरकोंडाने गुपचूप उरकलं लग्न?

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता विजय देवरकोंडा व अभिनेत्री रश्मिका मंदाना डेट करत असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. डिअर कॉम्रेड व गीता गोविंदम चित्रपटात त्यांनी एकत्र काम केलं होतं. त्यांची जोडीही प्रेक्षकांच्या भलतीच पसंतीस उतरली होती. त्यानंतर ते दोघेही रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा सुरू होत्या.

रश्मिका व देवरकोंडाच्या रिलेशनशिपबद्दलच्या चर्चांना उधाण आलेलं असतानाच त्यांचा एक फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या फोटोवरुन त्यांनी गुपचूप लग्न उरकलं की काय असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. रश्मिका व देवरकोंडा या व्हायरल झालेल्या फोटोमध्ये नववधू व वराच्या पोशाखात दिसत आहेत. शिवाय लग्नात वर-वधू एकमेकांना घालतात तसे हारही त्यांच्या गळ्यात दिसत आहेत. त्यामुळे ते खरंच विवाहबंधनात अडकले की काय, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे.



# गौतमी देशपांडेच्या हातावर सजली मेहंदी

अभिनेत्री गौतमी देशपांडे ही मराठी मनोरंजन सृष्टीतील एक ग्लॅमरस अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. 'सारे तुझ्याकसाठी' मालिकेतून तिने छोट्या पडद्यावर पदार्पण केले होते. गौतमीला 'माझा होशील ना' मालिकेमुळे प्रसिद्धी मिळाली. तिची बहीण मृण्मयी देशपांडेदेखील अभिनेत्री आहे. दोघींचे सोशल मीडियावर धमाल व्हिडीओ व्हायरल होत असतात. मृण्मयी आणि गौतमी दोघी बहिणींमध्ये त्यांच्या नात्यापलीकडची मैत्री पाहायला मिळते. नुकताच तिचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.

गौतमी देशपांडेचे आज अनेक चाहते आहेत. सोशल मीडियावर ती आपल्या फोटोशूटचे फोटो शेअर करत असते. तिने नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यात ती हातावर मेहंदी काढत आहे. तिच्या या व्हिडीओमुळे साहजिकच नेटकऱ्यांनी चाहत्यांना उत्सुकता निर्माण झालं की गौतमी देशपांडेच लग्न ठरलं आहे का अशी शंका त्यांनी आली मात्र गौतमीने कॅप्शनमध्ये लिहलं आहे की 'बहिणीच्या साखरपुड्यासाठी मेहंदी काढत आहे.' असा कॅप्शन तिने दिला आहे. मेहंदी हातावर काढून घेताना गौतमी आनंदी दिसत आहे.



मृण्मयी, गौतमी या दोघी बहिणी मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असल्या तरी त्या दोघी व्यवसायदेखील करतात. निल अँड मोमो असं त्यांच्या ब्रॅन्डचं नाव आहे.

यामध्ये त्यानं हाताने बनवलेले साबण विकतात. गौतमी मूळची पुण्याची असून कॉलेजला असताना नाटकात भाग घेऊन तिने अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले.

# धोंडी -चंप्याची प्रेमकहाणी; भरत जाधव वैभव मांगले जोडी येतेय तुम्हाला हसवायला

मराठी चित्रपटसृष्टीत कायमच दर्जेदार विषय हाताळले जातात. ऐतिहासिक, बायोपिक, कौटुंबिक सामाजिक विषयांवर भाष्य करणारे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत असतात. सिनेअभ्यासक आणि तज्ञ तरण आदर्श यांनादेखील मराठी चित्रपटाची भुरळ पडली आहे. 'धोंडी चंप्या: एक प्रेम कथा' या आगामी चित्रपटाचा टीझर त्यांनी आपल्या ट्विटर अकाउंटवर शेअर केला आहे.

'धोंडी चंप्या: एक प्रेम कथा' हा चित्रपट




टीझरवरून तरी एक विनोदी चित्रपट आहे असं दिसतंय. एक आगळीवेगळी प्रेमकहाणी असणाऱ्या या चित्रपटात भरत जाधव, वैभव मांगले, सायली पाटील, निखिल चव्हाण यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सायली आणि निखिलची म्हणजेच ओवी आणि आदित्यची. या सगळ्यांच्या प्रेमाच्या आड येत आहेत, अंकुश आणि उमाजी. टिझरमध्ये या दोघांमध्येही अनेक खटके उडताना दिसत आहेत. त्यामुळे आता धोंडी -चंप्या आणि ओवी- आदित्यची यांचे प्रेम यशस्वी होणार का, हे जाणून घेण्यासाठी आपल्याला १६ डिसेंबरपर्यंत वाट पाहावी लागेल. चित्रपटाचे दिग्दर्शन ज्ञानेश भालेकर यांचे असून प्रभाकर भोगले यांच्या कथेला प्रेरित होऊन 'धोंडी चंप्या: एक प्रेम कथा'ची निर्मिती करण्यात आलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद ज्ञानेश भालेकर आणि सागर केसरकर यांचे आहेत.रिलायन्स एंटरटेनमेंट प्रस्तुत सुनील जैन आणि कल्ट डिजिटल यांच्या सहकार्याने, फिफ्थ डायमेन्शन आणि कल्ट डिजिटल निर्मितीची बाजू सांभाळली आहे.

# टीम इंडियाचं 'हार्दिक' अभिनंदन!

# मालिका 1-0 ने जिंकली!

## दोन सामने पावसाचे, एक भारताचा न्यूझीलंडच्या खात्यात शून्य

**दोहा।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड मालिकेतील तिसरा आणि अखेरचा सामना आज म्हणजे मंगळवारी २२ नोव्हेंबर रोजी मॅक्लीन पार्क नेपियर येथे खेळला गेला. टीम इंडिया सध्या न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आहे आणि हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ३ सामन्यांची टी२० मालिकेत १-० असा विजय मिळवत मालिका खिशात घातली. न्यूझीलंडचा आजच्या सामन्यातील कर्णधार टीम साऊदीने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधार केन विलियम्सन दुखापतीमुळे आजचा सामना खेळू शकला नाही. त्याच्या ऐवजी मार्क चॅपमनला संघात स्थान देण्यात आले होते. सलामीवीर डेव्हॉन कॉनवे आणि ग्लेन फिलिप्स यांच्या अर्धशतकांच्या जोरावर न्यूझीलंड संघाने १६० ही सन्मानजनक धावसंख्या उभारली होती.



न्यूझीलंडने ठेवलेल्या १६१ धावांचा पाठलाग करताना टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. सलामीवीर ईशान किशन, ऋषभ पंत आणि श्रेयस अय्यर स्वस्तात माघारी परतले. ईशान आणि पंतने अनुक्रमे १० आणि ११ धावा केल्या. तर श्रेयस अय्यरला भोपळाही फोडता आला नाही. न्यूझीलंडचा आजच्या सामन्यातील कर्णधार टीम साऊदीने २ गडी बाद केले. त्यानंतर भारताचा 'द- स्काय' सूर्यकुमार यादव आणि कर्णधार हार्दिक पांड्या यांनी धुव्वाधार फलंदाजी करत पॉवर प्ले मध्ये ५७ धावा केल्या. पण मोठा फटका मारण्याच्या नादात सूर्यकुमार बाद झाला. त्यानंतर पावसाला सुरुवात झाली आणि शेवटी सामना तिथेच थांबविण्यात आला. नऊ षटकात ७६ धावांची गरज असताना टीम इंडियाच्या ७५ धावा झाल्या होत्या. त्यामुळे डकवर्थ लुईसच्या नियमानुसार सामना बरोबरीत सुटला आणि १-०ने मालिका खिशात घातली. तत्पूर्वी, न्यूझीलंडच्या त्या दोन खेळाडूंव्यतिरिक्त कोणालाही मोठी धावसंख्या उभारता आली नाही. ते दोन खेळाडू म्हणजेच डेव्हॉन कॉनवे आणि ग्लेन फिलिप्स होय. भारतीय गोलंदाजांनी त्यांच्यावर दबाव आणत शेवटच्या पाच षटकात ३० धावांत तब्बल ८ गडी बाद केले. या दोघांच्या जोरावरच न्यूझीलंडला दीडशे धावांचा आकडा पार करता आला. हा सामना न्यूझीलंडसाठी खूपच महत्त्वाचा आहे. कारण, यापूर्वी झालेल्या सामन्यात भारताने विजय मिळवला होता. त्यामुळे हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली भारताने न्यूझीलंडमध्ये मालिका विजय संपादन केला.

न्यूझीलंडकडून फलंदाजी करताना सलामीवीर डेवॉन कॉनवे याने सर्वाधिक धावा चोपल्या. यावेळी त्याने ४९ चेंडूत ५९ धावा केल्या. या धावा करताना त्याने २ षटकार आणि ५ चौकारांचीही बरसात केली. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट हा १२०.४१ इतका होता. त्याच्याव्यतिरिक्त ग्लेन फिलिप्स यानेही ३३ चेंडूत ३ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ५४ धावा चोपल्या. या दोघांव्यतिरिक्त एकाही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. मार्क चॅम्पमनने १२, डॅरिल मिचेलने १० आणि मिचेल सँटनरने १ धावांचे योगदान दिले. न्यूझीलंडच्या ३ फलंदाजांना भोपळाही फोडता आला नाही.

# इराणचा संघ अडचणीत; होणार कारवाई?

**दोहा ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपमधील ग्रुप B च्या पहिला सामना इंग्लंड आणि इराण यांच्यात झाला. हा सामना सुरू होण्यापूर्वीच वादग्रस्त ठरला. आता इराणचा संघ अडचणीत येणार असल्याचे फुटबॉलच्या महाकुंभात बोलले जात आहे. इराणच्या फुटबॉल संघाने आपल्याच देशाचे राष्ट्रगीत म्हणण्यास नकार देत देशात सुरू असलेल्या सरकारविरोधी आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शवला. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

शासनाविरोधात आवाज उठवल्याबद्दल खेळाडूंना कठोर कारवाईला सामोरे जावे लागू शकते. इराणच्या राजवटीने फुटबॉल खेळाडूंविरोधात अटक वॉरंट जारी केल्याचा दावा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या सरकारला आव्हान दिल्याबद्दल, इराणी खेळाडूंना तुरुंगात टाकले जाऊ शकते, नजरकैदेत ठेवले जाऊ शकते. तसेच, फुटबॉल बोर्ड स्वतःच बरखास्त केले जाऊ शकते, ज्यामुळे संघाला भविष्यातील कोणत्याही आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यापासून प्रतिबंधित केले जाऊ शकते. अशा अनेक शक्यता वर्तवण्यात येत आहे.

इराण हा गेल्या दोन महिन्यापासून देशांतर्गत आंदोलनाने पार हादरून गेला आहे. 16 सप्टेंबरला इराणच्या कुर्दिश वंशाच्या 22 वर्षीय माशा अमिनीचा पोलिसांच्या ताब्यात असताना मृत्यू झाला होता. यानंतर इराणमध्ये आंदोलने सुरू आहेत. अमिनीला इस्लामिक रिपब्लिकच्या महिलांसाठीच्या ड्रेस कोडचा भंग केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही